


**राज्य प्रकल्प संचालक**
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद
महाराष्ट्र राज्य


## शुभेच्छा संदेश

भविष्यकाळातील आव्हाने पेलणारा विद्यार्थी माध्यमिक शिक्षणातून निर्माण करायचा असेल तर आपले शिक्षक हे सक्षम असणे आवश्यक आहे. सक्षम शिक्षक तयार करण्याकरीता आपल्याला फार काम करावे लागणार आहे आणि ही संधी राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानामुळे आपल्याला प्राप्त झाली आहे. या अभियानांतर्गत राज्यातील मुख्याध्यापक व शिक्षक यांना सन 2017 पर्यंत दरवर्षी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणामध्ये आपण फक्त विषय कसा शिकवावा एवढेच प्रशिक्षण देत नाही तर अध्यापनाची तत्वे, नवप्रवाह व तंत्रे यावर भर दिलेला आहे. यामुळे प्रशिक्षणातून बदल घडू शकतो हे चित्र प्रशिक्षणानंतर दिसू लागले आहे.

प्रशिक्षणानंतर पुढे काय, हा प्रश्न जसा शिक्षकांकडून विचारला जातो, तसा यावर आम्हीसुध्दा विचार करीत आहोत. शिक्षकांना प्रशिक्षणानंतरसुध्दा शैक्षणिक पाठिंबा मिळण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. यापैकी 'उत्कर्ष' वेबसाईट हा एक उपक्रम आहे. आम्हाला आशा आहे की, या वेबसाईटमुळे प्रशिक्षणातून नेमके काय शिकवले जाते, हे ही सर्वसामान्यांपर्यंत पोहोचेल. तसेच इतरांना या साहित्याचा उपयोग आपल्या शैक्षणिक कार्यामध्ये करता येऊ शकेल.

(श्री. प्रधान)